तात्काळ/महत्वाचे

मंत्रालय येथे कार्यरत असलेलया महाराष्ट्र
वित्त व लेखा सेवेतील गट “अ” व गट“ब”
संवर्गातील अधिकाऱ्यांचे महापार
प्रणालीमधील कार्यमुल्यमापन अहवालाबाबत.

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय , लेखा व कोषागारे**
**“कस्तुरी” इमारत, तळ मजला, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई ४०००२०.**

**दुरध्वनी क्रमांक: ०२२-२२६२२०३६** **ई-मेल :** aaomahapardat.mu-mh@gov.in

**पहा :** १.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर १२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि. ०२.०२.२०१७.
२.शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीएफआर १२१७/प्र.क्र.१३१/तेरा,दि.१५.१२.२०१७.
३.संचालनालाचे परिपत्रक क्र.संलेको १२.२०१७/गोअकक्ष/स.अ.२/गोअपरिपत्रक/२०१७-१८/४७७, दि.१९.१२.२०१७.
४.शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.सीएफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि.०७.०२.२०१८.
५.संचालनालाचे परिपत्रक क्र.संलेको ०५.२०१८/गोअकक्ष/स.अ.२/गोअपरिपत्रक/२०१७-१८/७८, दि.१६.०४.२०१८.

**************************************************************************************************************

क्र.संलेको ०४.२०२४/क.ले.३/महापार परिपत्रक/गोअक/ 189 दि. 15.04.2024

## परिपत्रक

महापार प्रणालीमध्ये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेच्या“गट अ” व “गट ब” (राजपत्रित) संवर्गातील संचालक ते सहाय्यक लेखा अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल लिहिण्यात येतात.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संचालक ते सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांचे महापार प्रणालीमध्ये ऑनलाईन कार्यमूल्यमापन अहवालाकरिता Work Flow तयार करून आस्थापना विषयक परिशिष्ट “अ” ची माहिती भरून संबंधित अधिकाऱ्यांच्या Login ID वर पाठविण्याची जबाबदारी संचालनालयाच्या संदर्भ क्र. ५ च्या परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या कार्यालयांना देण्यात आली आहे.

मंत्रालयामध्ये कार्यरत असलेलया महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेच्या“गट अ” व “गट ब” (राजपत्रित) संवर्गातील संचालक ते सहाय्यक लेखा अधिकारी यांची परिशिष्ट अ ची (आस्थापना विषयक)संबंधित संस्करण/ आस्थापना अधिकाऱ्यांमार्फत प्राप्त झालेली माहिती वरून त्यांचे workflow तयार करून संबंधित अधिकारी यांच्या login आयडीवर पाठविण्याची जबाबदारी संचालनालय,लेखा व कोषागारे,मुंबई या कार्यालयास देण्यात आलेली आहे.

तरी मंत्रालय येथे कार्यरत असलेलया सर्व महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेच्या"गट अ" व "गट ब" (राजपत्रित) संवर्गातील अधिकारी यांनी त्याची परिशिष्ट अ ची (आस्थापना विषयक) माहिती संबंधित संस्करण/ आस्थापना अधिकाऱ्यामार्फत संचालनालयास दि. २२.०४.२०२४ पूर्वी पाठविण्यात यावी.तद्नंतर प्राप्त झालेली परिशिष्ट अ ची (आस्थापना विषयक) माहिती विचारात घेण्यात येणार नाही व त्याची जबाबदारी संबंधित कार्यालयातील संस्करण अधिकारी व संबंधित अधिकारी यांची राहील.

तसेच प्रत्येक प्रतिवेदन वर्षात कार्यमुल्यमापन अहवालाबाबत उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करावी,जेणेकरून संबंधित अधिकारी यांचे महापार प्रणालीमधील कार्यमुल्यमापन अहवाल विहित कालमर्यादेत तयार होतील.

(रश्मी नांदिवडेकर)
सह संचालक (प्रशासन)
लेखा व कोषागारे,मुंबई